Gokhale Education Society's

# SMRK-BK-AK Mahila Mahavidyalaya, Nashik.

## EVENT REPORT

| | |
|---|---|
| Name of the Programme | **Seminar (परिसंवाद)** |
| Day and Date | Saturday, 30th Nov. 2024 |
| Organising Committee/Department (Mention Collaborating Agency) | मराठी विभाग<br>Dept. of Marathi |
| Time | 3.00 p.m to 5.00 p.m |
| Topic /Theme | **चौकटीपलीकडचे साहित्य** |
| Resource Person/s | डॉ. रमेश वरखेडे, लेखक, समीक्षक, डॉ. एकनाथ पगार, समीक्षक |
| Students and staff attended the Programme | **58** |
| Brief Summary | संस्थापक प्राचार्या आणि पहिल्या मराठी विभागप्रमुख स्व. डॉ. सुनंदाताई गोसावी यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित्त अभिवादनपर परिसंवादाचे आयोजन मराठी विभागाने केले. चौकटीपलीकडचे साहित्य हा विषय होता. ख्यातनाम लेखक, समीक्षक डॉ. रमेश वरखेडे आणि लेखक, समीक्षक डॉ. एकनाथ पगार हे प्रमुख अतिथी वक्ते होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे विभागीय सचिव डॉ. राम कुलकर्णी होते. जीवनमूल्यांपर्यंत पोहचण्याची क्षमता केवळ साहित्यात असते असे सांगत डॉ. रमेश वरखेडे यांनी संत ज्ञानेश्वरांचे वाङ्मय, ताराबाई शिंदे यांचे स्त्रीपुरुष तुलना, केशवसुत यांची तुतारी कविता, मर्ढेकरांच्या कविता, पु.शि. रेगे यांची सावित्री कादंबरी यासह आजच्या प्रणव सखदेव, प्रवीण बांदेकर, निखिलेश चित्रे, नितीन रिंढे यांची पुस्तकांवरील पुस्तके हेदेखील चौकटीपलीकडचे साहित्य असल्याचे सांगितले. तर डॉ. एकनाथ पगार आपल्या नर्मविनोदी शैलीत म्हणाले की, शासकीय अहवाल, कायदाविषयक दस्तावेज, जाहिरात संहिता, ब्लॉग, आकाशवाणीवरील श्रुतिका, शोधनिबंध यापासून ते औषधाबरोबर येणारे माहितीपत्रक हे सर्व चौकटीपलीकडले साहित्य म्हणता येईल. पाककलेची मार्गदर्शक पुस्तके, व्यक्तिमत्त्व विकास यासह वृत्तपत्रातील अग्रलेखांपर्यंत सगळ्या लेखनाचा समावेश अशा साहित्यात होतो. अशा साहित्यातूनही मानवी जीवनात चांगले बदल घडू शकतात. पण 'स्व' पासून दुरावण्यास असे साहित्य भाग पाडेल का ? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. मजकुराची सत्यता, संवेदनशीलता आणि मानवी मनाचे भरणपोषण करणारे साहित्य असावे अशी अपेक्षा या समीक्षकांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोखले संस्थेचे विभागीय सचिव डॉ. राम कुलकर्णी होते. डॉ. सुनंदाताईंचे अध्यापन क्षेत्रातील कार्य महनीय होते. गरजू महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी त्या अविरत झटल्या असे सांगत त्यांनी अशा विविध विषयांना |

| | |
|---|---|
| | सामावून घेणाऱ्या परिसंवादाच्या आयोजनाबाबत कौतुक केले. प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर यांनी डॉ. सुनंदाताई गोसावी यांच्या साहित्यविषयक योगदानाचा आढावा घेत महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीत त्यांचा आणि संस्थेच्या सचिव डॉ. सौ. दीप्ती देशपांडे यांचा सर्वाधिक वाटा आहे असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. सायली आचार्य यांनी केले. डॉ. आश्लेषा कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. अर्चना घोडके यांनी आभार मानले. याप्रसंगी ज्येष्ठ लेखिका सौ. मंगला वरखेडे, श्री. जयंत भावे, उपप्राचार्य डॉ. नितीन सोनगीरकर, कलाशाखा समन्वयक पं. डॉ. अविराज तायडे, आर्कि. संजय पाबारी, सौ. शोभा त्रिभुवन, सौ. मैथिली लाखे, प्रा. उज्ज्वला लांडगे यांच्यासह कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील प्राध्यापक वृंद, कर्मचारी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते. |

| | | | |
|---|---|---|---|
| **डॉ. सायली आचार्य** | **डॉ. अविराज तायडे** | **डॉ. नितीन सोनगीरकर** | **डॉ. संध्या खेडेकर** |
| मराठी विभागप्रमुख (प्र.) | कलाशाखा समन्वयक | उपप्राचार्य | प्राचार्या |

मराठी विभाग आयोजित

## परिसंवाद विषय - चौकटीपलीकडचे साहित्य

**प्रमुख अतिथी वक्ते – डॉ. रमेश वरखेडे, ज्येष्ठ लेखक, समीक्षक, डॉ. एकनाथ पगार, अध्यक्ष-डॉ. राम कुलकर्णी**




स्व. डॉ. सुनंदाताई गोसावी यांच्या प्रतिमेचे पूजन करताना
संस्थेचे विभागीय सचिव मा. डॉ. राम कुलकर्णी









प्रमुख वक्ते, अतिथी डॉ. रमेश वरखेडे, डॉ. एकनाथ पगार आणि अध्यक्ष डॉ. राम कुलकर्णी उपस्थितांशी संवाद साधताना



अध्यक्ष डॉ. राम कुलकर्णी यांचा सत्कार करताना प्राचार्या डॉ. संध्या



डॉ. रमेश वरखेडे यांचा सत्कार करताना डॉ. राम कुलकर्णी



डॉ. एकनाथ पगार यांचा सत्कार करताना डॉ. राम कुलकर्णी



स्वागतपर मनोगत करताना प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर



कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मराठी विभागप्रमुख डॉ. सायली आचार्य



परिसंवादात सहभागी मान्यवर आणि प्राध्यापक वृंद

| | | | |
|---|---|---|---|
| **डॉ. सायली आचार्य** | **डॉ. अविराज तायडे** | **डॉ. नितीन सोनगीरकर** | **डॉ. संध्या खेडेकर** |
| मराठी विभागप्रमुख (प्र.) | कलाशाखा समन्वयक | उपप्राचार्य | प्राचार्या |